Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –10, April.2013
ISSN:- 2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

आदिवासी समाजातील डाकीण प्रथा : आर्थिक व सामाजिक वास्तव

दिलीप रामभाऊ जगताप,
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र व वाणिज्य विभाय गजमल तुळशिराम पाटील महाविद्यालय, नंदुरबार

सारांश :-

आर्थिक महासतेकडे वेगाने वाटचाल करणाऱ्या भारतात अद्यापही जादुटोणा, करणी, वशीकरण, डाकीण या हानिकारक अनिष्ट प्रथा वाढत असल्याचे आढळून येते २१ व्या शतकातील लोकांना मध्ययुगात नेऊन ठेवणारी घटना ८ जुलै २०१२ रोजी घडली. जादुटोणा केल्याचा आरोप करुन झारखंड राज्यातील लातेहार गावातील पंचायतने एका वृध्द दापत्याला मलमूत्र प्राशन करण्यास भाग पाडल्याचा लज्जास्पद प्रकार झाला. त्याचाच एक प्रकार म्हणजे हजारो स्त्रियांना चेटकीण अथवा डाकीण ठरवले जाऊन दगडांनी ठेचून ठार मारले जाते. गावातून बाहेर काढले जाते. त्यांच्या कुटुंबाना वाळीत टाकले जाते. अंधश्रध्दा ही समाजाला लागलेली कीड आहे तिचा पूर्णपणे नायनाट होऊ शकेल अशा किटकनाशकांचा शोध अजून तरी कोणीही लावू शकलेले नाही. अशाच अंधश्रध्देतून आदिवासी समाजात डाकीण ही प्रथा समस्या उदयास आलेली आहे. डाकीणचा शापित कलंक माथी घेऊन सातपुड्यातील शेकडे महिला देशोधडीला लागलेल्या आहेत. नंदुरबार या संपूर्ण आदिवासी जिल्ह्यात डाकीण काढण्याच्या प्रथा पुन्हा पुन्हा घडतात. ह्या कलंकीत, अनिष्ठ प्रथा कायम स्वरुपी बंद करुन आदिवासी स्त्रियांना न्याय मिळणे आवश्यक आहे.

बीजशब्द:- (key words) अंधश्रध्दा, डाकीण, भगत, कारागीर, अनिस, बभिलोटचा पाटला

प्रस्तावना:-

आदिवासी समाजात कोणतीही दु:खद घटना घडली की त्यामागे डाकणचा हात आहे असे गृहित धरले जाते. आदिवासी जमतीमध्ये तिला चेटकी, चेटकीण, भुताळी, भुताळीण, जखीण, जाखीण, डायन, हडळ, डाकण व डाकीण असे संबोधले जाते. नाव अनेक पण प्रत्येक भातात तिचे रुप वेगळे, प्रथा वेगळी परंपरा वेगळी महाराष्ट्रत अमरावती , धुळे, नाशिक, नंदुरबार, ठाणे, चंद्रपुर, गोंदिया, व गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यामध्ये डाकीणची समस्या फार मोठ्या प्रामाणात आढळते. नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी गावांमध्ये, पाड्यांमध्ये डाकीण प्रथा हा संवेदनशील विषय आहे. जिल्ह्यातील अक्कलकुवा तळोदा व धडगाव तालुक्यात या समस्येने गंभीर रुप धारण केलेले आहे. अक्कलकुवा तालुक्यातील दुर्गम भागाच्या मोलगी पोलीस ठाण्यात डाकीण विषयक गुन्ह्यांच्या जास्त प्रमाणात नोंदी झालेल्या आढळतात.नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम भागात सातपुड्यात व सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये डाकीण, डाकणा प्रथा पूर्वापार असल्याचे आढळते. नंदुरबार तालुक्यातील एका गावाचे नावसुध्दा या घटनांवरुन "डाकीण पाडा" पडलेले आहे. जिल्ह्यात गेल्या १० वर्षात डाकीण विषयक गुन्ह्यांच्या ३०० पर्यंत नोंदी असल्याचे आढळुन येते परंतु नोंद न झालेल्या घटनांची संख्याही आधिक असल्याची माहिती मिळते.

संशोधन साहित्याचा आढावा : (Review of Literature):-

प्रस्तुत संशोधन विषयाचे अनेक अध्ययनकर्त्यांनी अध्ययन केलेले आहे व त्यांनी या प्रथेचे विश्लेषण केलेले आहे. संध्या नरे-पवार (२०१२) यांच्या अध्ययनानुसार शहरी सुशिक्षितांना तसेच आदिवासी सुशिक्षितांना देखील डाकीण सारख्या प्रथा आपला प्रश्न वाटत नाही. आदिवासीच्या मनात डाकीण असते. पाड्यावर काहीही वाईट घडते की, माणसाची जनावरे होतात?[१] प्रा.आदिती मुळे (२०१३) आदिवासी समाजाचे जगण्याचे समज प्रथा समजून घेतल्या की लक्षात येते की, कोणत्याही नुकसानकारक घटनेमागे चेटूक हेच असते [२]समीर मराठे पत्रकार (२०१२) यांच्यामते एक वास्तव अधोरेखित होते ते म्हणजे डाकीणसारख्या प्रथा भगत बडवा कारागिर या सारख्या परंपरा अजूनही अस्तित्वात आहेत रमाकांत पाटील संपादक, लोकमत (२०१२) जिल्ह्यातील डाकीण प्रथा आणखी किती बळी घेणार? ही अ मानवी प्रथा थांबली पाहीजे. प्रा.जयश्री पाटील (२०१२) यांच्यामते, डाकीण प्रथा ही एक अंधश्रध्दा आहे. तिच्यामुळे समाजाचे नुकसान होते. माहिलाच महिलांच्या शत्रु असल्याचे आढळते, हे शत्रृत्व मिटविले पाहिजे त्यासाठी माणसाच्या जीवाची किमंत ओळखली पाहिजे व महिलानीच अधिक जागृत होण्याची गरज आहे. नरेंद्र दाभोळकर अंनिस (२०१२), अशा प्रथाविरोथी कायदा करण्याची गरज आहे. कायघान प्रश्न समूळ नष्ट होत नाही. परंतु लोकांची

मानसिकता बदलण्यास मदत होते. आणि त्या प्रश्नांची तिव्रताही चटकन ध्यानात येते, [३]डॉ.एन.डी.चौधरी (२०१०) जिल्ह्यातील आदिवासी महिलांचा दर्जा दुय्यम आहे. डाकीण प्रथा ही आदिवासी महिलांच्यामानवी हक्काचे उलंध्यन करणारी आहे. ही हिंसात्मक प्रथा नष्ट झाली पाहिजे. त्याकरिता कठोर कायदा करते गरजेचे आहे.[४]

संशोधन पद्धती : (Methodology) :-

समस्यासूत्रण निवडतांना प्रस्तुत अध्ययनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर केलेला आहे.

१. प्राथमिक सामग्री :- अध्ययनासाठी संशोधकाने नमुना निवड पद्धतीचा व सर्व्हेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधकाने नंदुरबार - २५, शहादा - २५, नवापूर - २५, तळोदा - २५, अक्कलकुवा - २५ व धडगाव (अक्राणी) - २५, अशाप्रकारे संपूर्ण सहाही तालुक्यातून १५० उत्तरदात्यांकडून प्रश्नावली अनुसुत्रि सहय्याने माहिती मिळवलेली आहे. तसेच काही डाकीण काढलेल्या महिलांच्या मुलाखतील घेऊन माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

२. दुय्यम सामग्री :- दुय्यम सामग्रीत डाकीण प्रथा समस्या विषयक ग्रंथ, अंधकार निर्मुलन पालिका, हाकारा खाजगी अहवाल दै.सकाळ लोकमत , देशदुत व नंददर्शन वर्तमानपत्रातील माहिती व विविध वेबसाईट वरिल माहितीचा वापर केलेला आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे (Objectioves of Study) :-

१) डाकीण प्रथेमागची कारणे अभ्यासणे
२) डाकीण प्रथेची आर्थिक व सामाजिक वैशिष्टे अभ्यासणे
३) बाधीत महिल्यांच्या समस्या व परिणाम अभ्यासणे
४) डाकीण प्रथा निर्मुलनासाठी उपाय सुचविणे

गृहितके :-

१) डाकीण म्हणून फक्त महिलांवरच नाहीतर पुरुषांवर देखील संशय घेतला जातो.
२) डाकीण काढलेल्यांना भयंकर त्रासाला सोमोरे जावे लागते
३) या अंधश्रध्देवर अशिक्षितच नाहीतर सुशिक्षित देखील विश्वास ठेवतात.
४) डाकीण ठरविण्यामागे आर्थिक व सामाजिक स्वार्थ आहे.

डाकीण प्रथेचे विश्लेषण :-

दिनांक १२ ते २०११ माकलीउमर ता.उक्कलकुवा जि.नंदुरबार येथे सकाळी ८.३० वाजता जादुटोणा करते व डाकीण आहे म्हणून कुटुंबीय व गावकऱ्यांनी जेहराबाई कालुसिंग पटेल (वय २२) व तिचा मुलगा राकेश (वय १ वर्ष) यांना विष पाजून ठार मारले. विष दिल्यानंतर मुलगा ठार झाला परंतु महिला जिवंत होती. तेव्हा तिला तिच्या जाऊने गळा दाबुन अमानुषपणे ठार मारले. तर ११ वर्षापुर्वी म्हणजे ६ मे २००३ रोजी धडगाव तालुक्यातील मांडवी येथील केलीबाई पटले नावाच्या ६० वर्षाच्या वृध्द महिलेला डाकीण ठरवून दगडांनी ठेचुन ठार मारण्यात आले होते अशा हृदयद्रावक घटना जिल्ह्यात घडतात. अनेक घटना जातपंचायतीसमोर मिटविल्या जातात. पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचू दिल्या जात नाहीत.

जिल्ह्यातील पोलिस ठाणे व वर्षानिहाय डाकीण विषयक गुन्ह्यांची नोंद :-

नंदुरबार जिल्ह्यातील मोलगी (अक्कलकुवा), धडगांव व तळोदा पोलीस ठाण्यातंर्गत डाकीण ठरविलेल्या घटनांची गुन्हा म्हणून जास्त प्रमाणात नोंदी होतात. सारणी क्रमांक १ मध्ये या गुन्ह्याचे विश्लेषण केलेले आहे.

Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –10, April.2013
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.net

सारणी क्रं.१
वर्ष व पोलीस ठाणे निहाय डाकीण विषयक गुन्हे.

[redacted]

स्त्रोत - दै. सकाळ, नंदुरबार दि.१८ मे २०११

सारणी क्रंमाक ०१ वरील विश्लेषणावरुन स्पष्ट होते की, २००७ ते २०११ या पाच वर्षात डाकीण विषयक गुन्ह्यांची ८२ इतकी नोंद झालेली आढळते. त्यापैकी सर्वात जास्त घटना मोलगी ता.अक्कलकुव्यात झालेल्या आहेत हे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८५.३६% आहे. सर्व तालुक्यात २०१० मध्ये जास्त गुन्ह्यांची नोंद आहे. हे गुन्हे ३५ असून त्यांचे प्रमाण ४२.६८% इतके जास्त आहे.

वरील सारणीत २००७ पासूनची आकडेवारी दर्शवलेली आहे. परंतु त्यापुर्वी म्हणजे २००० ते २००५ या कालावधीत २१६ गुन्ह्यांची नोंद असल्याचे अधिकृतपणे कळते परंतु या पेक्षा या घटना अधिक असल्या पाहिजेत. या घटनांची संख्या जिल्ह्यात वर्षात सरासरी ७६ इतकी आहे. या विश्लेषणाकवरुन डाकीण या समस्येची भीषणता, दाहकता किती आहे ते कळते.

डाकीण प्रथा म्हणजे काय ? :- महिला नव्या जीवाला जन्म देऊ शकते. तिच्यात दैवी सामर्थ असते म्हणून ती दुसऱ्याला मारुही शकते जी स्त्री डाकीण बनते ती आधी मंत्र शिकते रात्री एकांतात ती नदीवर अथवा नाल्यात विवस्त्र होऊन अंघोळ करते अंघोळ झाल्यावर त्याच अवस्थेत ती मंदिरात येते व देवाकडून डाकीण होण्यची परवानगी मागते ही परवानगी मिळाल्यानंतर ती पहिला मंत्र-तंत्राचा प्रयोग आपल्या कुटुंबातील व्यक्तीवर करते त्यानंतर तिला सर्व सामर्थ्य प्राप्त होते. ती कोणतेही रुप धारण करु शकते. कुणाचेही कोणत्याही स्वरुपात नुकसान करु शकते.

सातपुड्याच्या गावात व पाड्यात कुठलीही दुर्देवी घटना घडल्यास त्यामागे डाकीणचा संशय व्यक्त केला जातो अगदी अपघात झाला कुणाचा मृत्यू झाला, जनावरांना आजार येने अथवा मृत्यमुखी पडणे कुणाला आजार झाला गावात एखादी साथ आल्यास किंवा गाय म्हैस दुध देणे थांबविल्यास कुढलीही घटना घडो, त्यामागे डाकीणचा संशय व्यक्त केला जातो. त्यातुनच गावातील एखाद्या महिलेला डाकीण ठरविले जाते.डाकीण ठरविण्याची प्रथा देखील अजब आहे.

डाकीण काढणे / ठरविण्याची पध्दती :- जी घटना घडली असेल म्हणजे कुणाचा मृत्यु झाल्यास तया मृतदेहाच्या अंगावरुन मुठभर धान्य घेऊन फिरविले जाते हे धान्य एका कागदात बांधुन नंतर सारे गाव एकत्र या भागातुन खास करुन गुजरातमधील पावागड, बावनगंज, होरापाणी तसेच चाळीसगावातील एका दर्ग्यावर जातात. ते धान्य वरीलपैकी कुठल्याही ठरविलेल्या ठिकाणी जाऊन तेथील मांत्रिकाला दाखविले जाते. हा मांत्रिक कशामुळे घटना घडली, कुणाची दृष्ट नजर लागली, गावात कोण डाकीण असेल तो अनुमान काढुन त्या महिलेला डाकीण ठरवितात.

डाकीण कोण? याचा शोध कसा लावायचा? संशयित स्त्रीला चांभाराकडे असलेल्या चांभाराकुंड्यातील पाणी पाजायचं एखादी प्यायली नाही किंवा पाणी पिऊन तीने उलटी केली ती डाकीण आहे असे समनायचे. चांभारकुंड्याच पाणी म्हणजे चांभांरानी गुराचे कातडे एका कुंड्यात (भांड्यात) बुडवुन ठेवलेले

असते ते पाणी असे पाणी घाणेरडे दूषित असल्याने स्त्रिया पित नाहीत. किंवा पाणी पिल्याने साहजिकच उलट्या होतात आणि ती स्त्री डाकण ठरुन अन्यायाला बळी पडते.[५]

डाकीण ठरविण्यासाठी एक स्थान आहे ते म्हणजे बभिलोटचा पाटला. आदिवासीच्या जीवनात कारागीर किंवा भगत यांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे . पृथ्वीतलावर प्रत्यक्ष अवतार घेतलेला त्यांचा पूर्वज म्हणज बाभिलोट म्हणजे आदिवासींचा गुरु: या बभिलोटला स्मरुन भगत आदिवासींवर उपचार करतात व डाकीण शोधुन देतात. कारागिर आपल्याकडच्या बभिलोटच्या पाटल्यावर उतरवून आणलेले धान्य ठेवतो व त्यावरुन अंदाज वर्तवतो आपल्या साहित्याव्दारे बघतो व डाकीण कोण आहे ते प्रत्यक्ष न सांगता डाकीगीचे घर अमुक दिशेला आहे. तिच्या घरात अमुक इतकि जनावर आहेत. घराच्या अंगणात अमुक एक झाड आहे. अस मोघम सांगतो कारागिराने सांगितलेला जास्तीत जास्त गोष्टी ज्या घराला लागु होतील ते मग डाकीणीच घर ठरत आणि त्यातील महिला डाकीण.

डाकीण प्रथेमागची कारणे:-

१) आदिवासी स्त्रीचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे.
२) अशिक्षित, निरक्षरता या कारणांमुळेही ही प्रथा वाढते.
३) पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे.
४) आर्थिक विकास न झाल्याने अतिमागासलेपणा हे सुध्दा डाकीण प्रथेमागचे प्रमुख कारण आहे.
५) दळणवळणच्या सोयी अद्यापही अपूर्ण असल्याने वेज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत.
६) आरोग्य विषयक सुविधांची कमरतता किंवा अपुरेपणा असल्याने आदिवासी बांधव हे देवीचा कोप किंवा आपल्याकडून काहीतरी चूक झाली असे मानतात
७) भगत कारागीर किंवा बडल्यावर अवलंबून राहणे
८) रोजगाराच्या संविधा नाहीत. त्यांच्याकडे उप्तन्न मिळविण्याचे साधन नसल्याने आदिवासी बांधव कोपकडे दिवसातुन अनेक तास रिकामे/ बेकार राहतात. म्हणतातना रिकामे डोके सैतानाचे घर असते.
९) दारिद्रय हे आणखी एक महत्वाचे कारण आहे.
१०) व्यसनाधिनता या कारणामुळेही या भागात अनेक अंधश्रध्दा वाढण्यात मदत मिळते. महुची दारु घराघरात बनत असल्यामुळे आदिवासी बांधव कायम नशेच्या अंमलात राहतो त्यामुळे त्याची सारासार विचार करण्याची शक्ती क्षीण होते.

डाकीण प्रथेचे परिणाम:-

१) डाकीण प्रथा व अंधश्रध्दा या समस्या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात येण्यामध्ये अडथळे निर्माण करतात.
२) आदिवासी समाजातील डाकीण ठरविलेल्या महिल्यांच्या मुलींचे लग्न जमत नाही. त्यांच्या कडेही संशयानेच पाहिले जाते.
३) डाकीण ठरविलेल्या महिलेचे व तिच्या कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक शोषण होते.
४) आदिवासी समाजाचेही भगत, कारागिर कडून मोठया प्रमाणात आर्थिक शोषण केले जाते. कोणत्याही कामासाठी कोंबड, अनधान्य दारु तसेच रोख पैसे ही मागितले जातात. त्यामुळे आधीच गरीब असलेले बांधव आण्खी गरीब होततत.
५) डाकीणसारख्या प्रथेमुळे कोणाचा जीव जातो. कोणाला वाळीत टाकले जाते. तर काहींचे संपूर्ण कुटुंबच देशोघडीला लागत. याचा वाईट परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावा लागतो.

**** भगत संस्थेवर विश्वास असणाऱ्या निवेदकांचे विश्लेषण:-*** भगत अथवा कारागिरवर विश्वास असणाऱ्या व नसणाचा आदिवासी बांधवाचे प्रमाण सारणी क्रमांक ०२ मध्ये दर्शविलेले आहे.

सारणी क्रमांक ०२ भगतावर विश्वास दर्शवणारे उत्तरराते

[redacted]

स्त्रोत : प्रत्यक्ष मुलाखत

टिप : उजवी कडील अंक टक्केवारी दर्शवतात.

सारणी क्रं ०२ मध्ये तालुकानिहाय भगत संस्थेवर विश्वास असणाऱ्या व नसणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण दर्शवले आहे. सर्व्हेक्षित १५० उत्तरदात्यापैकी ११६ उत्तरदाते भगत या संस्थेवर विश्वास ठेवतात. संपूर्ण जिल्ह्यातले हे प्रमाण ७७.३% आहे. विश्वास नसणारे १९ उत्तरदाते असुन त्यांचे प्रमाण १२.७% आहे. व महित नाही सांगणारे १५ उत्तरदाते असून त्यांचे प्रमाण १०% आहे. भगताच्या मानणारे सर्वाधिक अक्कलकुवार तालुक्यात आहेत. त्यांचे प्रमाण ९२% आहे. सर्वात कमी नंदुरबार जिल्ह्यात आहेत. त्यांचे प्रमाण ४४% आहे. तरी भगतावर विश्वास नसणारे सर्वाधिक नंदुरबार तालुक्यातील आहेत. त्यांचे प्रमाण ३२% आहे.

डाकीण प्रथा अस्तित्वात आहे / नाही सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण:-

सारणी क्रमांक ०३ मध्ये तालुकानिहाय डाकीण प्रथा आहे व नाही सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे विश्ळेषण केलेले आहे.

सारणी क्रंमाक ०३
डाकीण प्रथा आहे व नाही सांगणारे उत्तरदाते

[redacted]

स्त्रोत : प्रत्यक्ष मुलाखत

टिप : उजवी कडील अंक टक्केवारी दर्शवतात.

सारणी क्रं. ०३ वरिल आकडेवारीनुसार सर्व्होक्षीत १५० उत्तरदात्यपैकी १०४ उत्तरदाते डाकीण प्रथेवर विश्वास असल्याचे सांगतात. यांचे प्रमाण ६९.३% आहे. तर विश्वास नसणारे २०% आहेत. व १०.७% उत्तरदाते माहित नसल्याचे सांगितात. तालुकानिहाय विश्लेषण करावयाचे झाल्यास डाकीण प्रथेवर विश्वास दर्शवणारे धडगाव तालुक्यातील आहेत. त्यांचे प्रमाण १००% आहे. सर्वात कमी विश्वास (४०%) नंदुरबार तालुक्यातीलच आहेत. धडगाव तालुक्याच्या खालोखाल अक्कलकुवा (८४%) तळोदा (७६%), शहादा (६८%) व नवापूर(४८ %) डाकीण प्रथेवर विश्वास ठेवणारे आहेत.

डाकीण प्रथा आस्तित्वात असल्याचे सांगणाच्या उत्तरदात्यांचे शिक्षण व जमातीनुसार प्रमाण

सारणी क्रं ०४ मध्ये शिक्षण व जमातीनुसार डाकीण प्रथा अस्तित्वार असल्याचे सांगणाऱ्या उत्तरदात्याचे विश्ळेषण केलेले आहे.

शिक्षण व जमातीनुसार डाकीण प्रथा अस्तित्वार आहे / नाही सांगणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण

[redacted]

स्त्रोत : प्रत्यक्ष मुलाखत

टिप : उजवी कडील अंक टक्केवारी दर्शवतात.

सारणी क्रंमांक ०४ वरुन स्पष्ट होते की, सर्व्हेक्षित १५० उत्तरदात्यांपैकी डाकीण प्रथेवर विश्वास असणारे ६३.४% आदिवासी बांधव अशिक्षित असुन ३६.६% सुशिक्षित आहेत.जिल्ह्यातील सर्व्हेक्षित उत्तरदात्यापैकी मावची जामतीचे सर्वाधिक म्हणजे ७६.५% उत्तरदाते आशिक्षित आहेत. तर डाकीण प्रथे वर विश्वास असणाऱ्या भिल जमातीच्या उत्तरदात्यांचे प्रमाण ७१.८% आहे. व याच जमातीच्या सुशिक्षित उत्तरदात्यांचे प्रमाण २८.२% आहे. सुशिक्षित पावरा जमातीचे प्रमाण ५३.६% तर अशिक्षित उत्तरदात्यांचे प्रमाण ४६.४% आहे. धानका जमातीच्या उत्तरदात्या मध्ये अशिक्षितांचे प्रमाण ६३.७% तर सुशिक्षितांचे प्रमाण ३६.३% तरी गावीत जमातीतील सुशिक्षितांचे प्रमाण ३८.५% तरी अशिक्षितांचे प्रमाण ६१.५% आहे. यावरुन स्पष्ट होते की डाकीण प्रथा अस्तित्वात आहे. असे उत्तर देणाऱ्यांचे प्रमाण अशिक्षित समाजाबरोबर सुशिक्षित समाजामध्ये देखिल अधिक आहे.

निष्कर्ष :-

डाकीण विषयक प्रथेचे अध्ययन करण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील सहाही तालुक्यातून १५० उत्तरदात्यांचे सर्व्हेक्षण केले त्यातुन पुढील निष्कर्ष निघतात.

१) संशोधन क्षेत्रामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण ९०% आहे. गावाच्या ठिकाणी ४ ते ६ महिनेच काम मिळते त्यामुळे ९६% कुटुंबे बेरोजगार असतात.
२) संशोधन क्षेत्रातील ७१.४०% पुरुष व ८१.४७% स्त्रिया निरक्षर आहेत. त्यामुळे अंधश्रध्देचे प्रमाण अधिक आहे.
३) संशोधन क्षेत्रातील ६४.५०% पुरुष ४४.१८% स्त्रिया मद्यमान व धुम्रपान करतात. त्यामुळे व्यसनाधिनता जास्त आहे.
४) आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्यास ८७% आदिवासी बांधव भगताकडे उपचारासाठी जातात.
५) आदिवासी प्रथा आस्तिवात आहे. असे ६९.३% उत्तरदाते सांगतात. त्यापैकी ६३.४% आशिक्षित तर ३६.६% सुशिक्षित उत्तरदाते आहेत.
६) जमीन हडप करण्यासाठी डाकीण ठरविण्यात आल्याचे सांगणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.
७) डाकीण प्रथा परंपरागत व योग्य आहे असे सांगणाऱ्याचे प्रमाण ७५% पेक्षा जास्त आहे.
८) डाकीण विषयक गुन्हा हा संपूर्ण जमाव करतो व त्यात कुटुंबियांचे सदस्य देखील बअसतात. वास्तवात हा गुन्हा असतो परंतु आदिवासी बांधवाच्या नजरेत ती शिक्षा असते प्रसंगी जमाव पोलिसठाण्यावर चाल करुन येतो.
९) डाकीण ठरविलेल्या स्त्रियांची व्यथा हृदयद्रावक असते 'आयबी माहू हाय, म्हबी पोयरोसोयरो कोओआह हाय...., याहा सोडीन कहा जाऊ....'(मी देखील एक आई आहे. मलाही मुलबांल आहेत.घरदार आहे हे सोडून मी कुठं जाऊ.) ही मन सुन्न करणारी व्यथा आहे. साकलीउमर ता .अक्कलकुवा ग्रामपंचायत अंतर्गत असलेला सरी येथील टेंभलीपाडा पाडयातील सिपलीबाई भिमसिंग वसावे (वय ३०) या महिलेची.
१०) डाकीण ठरविण्यात आलेल्या महिलापैकी ७२% महिला ६० ते ७० वर्षे वयाच्या आहेत ४% महिला ७० पेक्षा जास्त वयाच्या आहेत. तर २४% महिला ३० ते ६० वर्षे या वयोगटातील आहेत.

शिफारशीः-

१) रिकाम्या हातांना काय मिळेल त्यांना रोजगार व उत्पन्न मिळेल त्यांचे दारिद्रय , गरिबी दुर होईल यासाठी शेतीला पाणी पुरवठा करणे, डोंगरावरील शेतीचे सपाटीकरण करणे उद्योग सुरु करणे आवश्यक आहे.
२) भौगोलिक परिस्थिती ,दुर्गमतेमुळे या घटना तेवढ्या उजेडात येत नाहीत, त्यामुळे दळणवळणाऱ्या सुविधा वाढविल्या पाहिजेच शासनाला प्रत्येक पाड्यापर्यंत रस्ते बांधणे आवश्यकआहे. परंतु त्यातल्या त्यात मुख्य गावापर्यंत रस्ते पोहोचले पाहिजेत.
३) भगत अथवा कारागीर ही संस्था मोडीत काढली पाहिजे. आदिवासी बांधवामध्ये जागृती निर्माण केली पाहिजे आज पाड्यापाड्या पर्यंत वीज व टि.व्ही., डिश केबल पोहोचलेले आहेत. पथनाटय , सिनेमा, दुरदर्शनाच्या माध्यमातुन या अनिष्ठ प्रथेचे उच्चाटन केले पाहिजे.
४) डाकीण विषयक गुन्हे पोलीस ठाण्यापर्यंत येऊ दिले जात नाही. यासाठी पोलीस पाटील संरपंच, पंचायत सदस्य यांना जबाबदार धरावे.
५) गुन्हेगावरीवर कठोर कारवाई व्हावी डाकीणीच्या दाखल गुन्ह्यात केलेल्या गुन्ह्यांसाठी त्यामध्ये साधारणपणे छळ करणे, जीवे ठार, मारण्याची धमकी देणे, मारहाण करणे अशा स्वरुपाच्या गुन्ह्यांना वापरण्यात येणाऱ्या कलमांमध्ये ३३७, ३४१, ३२४, ५७४, ५०६, व ३४ अशा काही कलमांचा वापर केला जातो. पण डाकीण विषयक गुन्हा गुन्हेगारावर दाखल करण्यासाठी स्वतंत्र कलम नाही. शासनाने यासाठी स्वतंत्र कलम ठरविणे आवश्यक आहे.
६) जिल्ह्यातील स्त्रिया व संघटनांनी याविषयी आवाज उठविला पाहिजे स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रु होतात. हे थांबले पाहिजे.
७) डाकीण जी भयानक, खतरनाक असते, डाकीण हे नाव उच्चारताच अंगावर काटे उभे राहतात. जी आपल्या मंत्रांनी अनेकांना आजारी पाडते जीव घेते, त्यांना खाते. तिच बिचारी, अगतिक महिला जमाव व आपलेच कुटुंबीय मागे लागल्यावर आपला जीव वाचवत एका ठिकाणाहून दुसरीकडे तिथून आणखी तिसरी कडे अशी पळत फिरत राहते हा विरोधाभास आदिवासी बांधवांना खासकरुन स्त्रियांना पटवायला हवा.

संदर्भः-

१) नरे-पवार संध्या (२०१२) डाकीण एक अमानवी प्रथा, लोकवाङ्मय गृह, पुणे.
२) मुळ्ये आदिती (सप्टें २०१२) , डाकीण -एक अमानवी प्रथाः शोध व अन्वयार्थ , अंधश्रध्दा निर्मुलन वार्तापत्र, ३०
३) दाभोळकर नरेंद्र (२०१२) नत्रैव.
४) Chaudhari N.D. (Nov २०१०) Violation of Human Rights of Tribal Women, Research Analysis & Evaluation VOL- I Issue-१४ Page NOS ६२ To ६३.
५) सोनवणे वाहरु (जुलै १९८४) आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान, हाकारा, मानव विज्ञान परिषद, पुणे, त्रौमासिक पान नं.१६ ते २०.
६) http://www.antisuperstition.org
७) Witch Hunting in Maharashtra http://antisuperstition.org
८) दैनिक लोकमत, नंदुरबार, समिर मराठे, डाकीण भाग १, २ व ३ १२ ऑगस्ट, १९ऑगस्ट व २६ ऑगस्ट २०१२ विशेष लेख.
९) दैनिक सकाळ, नंदुरबार , दिपक कुलकर्णी १८ मे २०११.
१०) दैनिक पुण्यनगरी, नंदुरबार. १५ मे २०११
११) देशदूत, नंददर्शन विविध अंक.